# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### धामणगाव (जि.अमरावती) येथील निवडक अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्त्यांचा सर्वांगिण विकास करण्याबाबत

**(१) ४६५५७ (०६-१०-२०२२). श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धामणगाव (जि.अमरावती) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती निमित्त निवडक अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्त्यांचा सर्वांगिण विकास या योजनेअंतर्गत कामांना मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.सामाजिक न्याय मंत्री यांना दिनांक २३ मार्च, २०२२ रोजी निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीनुसार या योजनेअंतर्गत अद्याप किती कामांना मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-११-२०२३) :** (१) व (२) सदरचे निवेदन विभागास प्राप्त झालेले नाही. तथापि, याबाबतचे निवेदन विभागास प्राप्त झाल्यानंतर त्यास मान्यता देण्याच्या अनुषंगाने शासन स्तरावरुन आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नगरपरिषद फैजपूर (ता.यावल, जि.जळगांव) येथील वैशिष्टयपूर्ण योजनेतंर्गत करण्यात आलेला गैरव्यवहार

**(२) ४७०९७ (१०-११-२०२२). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगरपरिषद फैजपूर (ता.यावल, जि.जळगांव) येथील वैशिष्टयपूर्ण योजनेतंर्गत सुशोभिकरण करणे (कामे ४) मधील निष्कृष्ट दर्जाचे काम व गैरव्यवहाराबाबत श्री.ललितकुमार चौधरी यांचे दिनांक २१ जून, २०१८ च्या तक्रारीच्या अनुषंगाने अध्यक्ष व सचिव तथा जिल्हाधिकारी, जिल्हा भ्रष्ट्राचार निर्मुलन समिती, जळगाव यांच्या चौकशीमध्ये गैरव्यवहार सिध्द झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने अधिकारी व मक्तेदार यांचेविरुद्ध कोणती कायदेशीर कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-११-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे. श्री. ललितकुमार चौधरी यांनी दि.२२.१०.२०१८ रोजी ईमेलद्वारे तक्रार केली आहे.

(२) आणि (३) उपविभागीय अधिकारी, फैजपूर, भाग फैजपूर यांचे अध्यक्षतेखाली स्थापन समितीमार्फत प्रशासकीय / तांत्रिक व दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, नाशिक यांचेमार्फत तांत्रिक बाबींची चौकशी / तपासणी करण्यात आलेली आहे.

सहायक आयुक्त, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव यांनी दि.०७.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये, विवादीत कामातील मक्तेदार यांनी भरलेली इसारा/अनामत रक्कम जप्त करण्यात यावी, तर संबंधितांना सदर रक्कम परत करण्यात आली असेल तर त्यांचेकडून वसुल करण्यात यावी तसेच संबंधित तीनही मक्तेदार/फर्म यांना २ वर्षासाठी काळया यादीत टाकण्याची कार्यवाही करणेबाबत मुख्याधिकारी, फैजपूर यांना कळविले आहे.

तसेच प्रस्तुत प्रकरणी जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांची चौकशी करण्याची आवश्यकता दिसून येत नाही असे अभिप्राय जिल्हाधिकारी, जळगांव यांनी दि.३१.०१.२०२३ रोजी दिले असल्याने, सदर प्रकरण शासन स्तरावर बंद करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे जिल्ह्यातील पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी अंतर्गत सुरक्षेसाठी CCTV कॅमेरे प्रत्यक्षात कार्यान्वित करण्याबाबत

**(३) ४९५४४ (१८-०१-२०२३). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत नागरिकांच्या सुरक्षिततेचा भाग म्हणून शहरामध्ये सुमारे ४ हजार CCTV कॅमेरे बसविण्याचे काम तीन वर्षापासून संथगतीने सुरु असल्याने अद्यापही पूर्ण झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १० नोव्हेंबर, २०२२ अखेर या कामाची सध्यस्थिती व त्यावर झालेला एकूण खर्च याचा तपशील काय आहे,

(३) असल्यास, सदरहू काम १०० टक्के पूर्ण करुन सर्वच CCTV कॅमेरे प्रत्यक्षात कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.

पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटीच्या प्रकल्पांतर्गत “Supply, Commissioning and O&M for ICT led PCSCL Smart City Solutions” या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी मे. टेक महिंद्रा व त्यांच्या कन्सोर्टियम यांची दिनांक ०६ जून, २०१९ रोजी नियुक्ती करण्यात आली होती. तथापि, कोव्हीड-१९, पावसाळ्यातील कामावरील निर्बंध यामुळे कामे विहित वेळेत पूर्ण करण्यास विलंब झालेला आहे. तथापि, स्मार्ट सिटी नियामक मंडळाने याबाबत संबंधित कंत्राटदारास दंडनीय मुदतवाढ मंजूर करण्यात आली आहे.

२) सदर कामाची भौतिक प्रगती ७५ टक्के आहे. सदर प्रकल्पांतर्गत एकूण ३३०३ कॅमेरे बसविणे अपेक्षित आहेत. सद्यस्थितीत २४८५ कॅमेरे बसवण्यात आले आहेत व उर्वरित ८१८ CCTV कॅमेरे बसवण्याचे नियोजन आहे.

शहर संनिरीक्षण (City Surveillance) अंतर्गत एकूण रुपये १९.८० कोटी व स्मार्ट वाहतूक (Smart Traffic) अंतर्गत एकूण रुपये ८.६७ कोटी खर्च झालेला असून एकत्रित खर्च रुपये २८.४७ कोटी झालेला आहे.

(३) व (४) सद्य:स्थितीत पिंपरी-चिंचवड शहरात विकासकामे सुरु असल्याने शहरात खोदाई करणेत येत आहे. खोदाई करताना OFC केबल तुटल्याने अडथळा निर्माण होत आहे. तसेच दाट लोकवस्ती असलेल्या ठिकाणी काम करणेसाठी अडचण निर्माण होत आहे. सदर प्रकल्पाचे काम दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२३ रोजीपर्यंत पूर्ण करण्याचे पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटीचे नियोजन आहे.

---

## पुणे येथे थर्माकोल आणि फोमची सर्रास विक्री सुरु असल्याबाबत

**(४) ४९६७० (२३-०१-२०२३). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाने थर्माकोल विक्रीला सन २०१८ मध्ये बंदी घातली असून पुणे येथे थर्माकोल आणि फोमची विक्री सुरू असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात पुणे महानगरपालिका प्रशासनाने महाराष्ट्र प्रदूषण नियत्रंक महामंडळाला थर्माकोल आणि फोमबाबत निवेदन केल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी थर्माकोल आणि फोमची सर्रास विक्रीवर नियंत्रण राखण्यासाठी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, तसेच उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-११-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने माहे ऑक्टोबर, २०२२ व नोव्हेंबर, २०२२ मध्ये पुणे महानगरपालिकेसोबत विशेष सर्वेक्षण मोहिम राबविण्यात आली व एकूण ५५९ आस्थापनांना भेटी देण्यात आल्या त्यापैकी एकूण ३९ आस्थापना दोषी आढळल्या असून त्यांच्याकडून बंदी असलेले १४५० किलो प्लास्टिक जप्त करुन एकूण रु.१,५५,०००/- दंड स्थानिक स्वराज्य संस्थेकडे जमा करण्यात आला आहे.

तसेच पुणे महानगरपालिकेच्या प्राप्त अहवालानुसार पुणे महानगरपलिकेने मार्च, २०१८ ते आजपर्यंत प्लास्टिक विक्रेते यांच्याकडे धाडी टाकून व प्लास्टिक वापर करणाऱ्या एकूण २११७ नागरिक व व्यावसायिक यांच्याकडून एकूण रु.१,०७,७५,०००/- दंड वसूल करण्यात आला असून प्लास्टिक विक्रेत्यांकडून एकूण ३३६३०.९५ किलो प्लास्टिकचा माल जप्त करण्यात आला आहे. याशिवाय दैनिक वृत्तपत्रात जाहिर आवाहने, प्रबोधनपर उपक्रम, कापडी पिशव्यांचे वाटप, पथनाटय अशा माध्यमांद्वारे प्रबोधन करुन सिंगल युज प्लॅस्टिक बंदीबाबत १०० टक्के अमलबजावणी करण्यात येत असल्याचे कळविलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## विदर्भातील खनिज समस्यांबाबत

**(५) ५०४८९ (). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भात खनिज संपती विपुल आहे मात्र त्यावर आधारीत गुंतवणूक व उद्योग विदर्भात उभारले पाहीजेत अशी मागणी “वेद” या संस्थेमार्फत माहे सप्टेंबर-आक्टोबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदर्भ इकॉनॉमिक डेव्हलपमेंट कौन्सिल (वेद) संस्थेच्या वतीने छत्तिसगड, झारखंड आदी राज्याप्रमाणे महाराष्ट्रात “खनन” धोरण आखले जावे अशी मागणी राज्यस्तरीय यंत्रणांकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विदर्भातील खनिज संपतीचा येथील अर्थव्यवस्थेला कोणताही लाभ होत नाही अशी खंत “वेद” संस्थेने व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विदर्भातील खनिजाच्या कच्च्या मालावर आधारीत विदर्भातच उद्योग उभारणीसाठी शासनाने कोणती कार्यवाही तसेच खाणीमुळे होणाऱ्या प्रदुषण रोखण्यासंदर्भांत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-११-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) विदर्भातील नागपूर, वर्धा, भंडारा आणि गोंदिया या ०४ जिल्हयांमध्ये १२ कोळशाच्या, १६ मँगनिजच्या आणि १० इतर खाणी कार्यरत आहेत. विदर्भात सध्या खनिज आधारित एकुण २३ कंपन्या असून त्यात वापरले जाणारे खनिज हे विदर्भातील खाणींमधून उत्पादीत खनिज आहे. सदर कंपन्यांद्वारे वीज, सिमेंट, लोखंड इ. चे उत्पादन केले जाते व त्याचा वापर विदर्भासह राज्यात केला जातो. या माध्यमातून विदर्भात मोठी गुंतवणूक होऊन खनिजावर आधारीत उद्योग वाढ व रोजगार निर्मीती होत असल्याने त्यातून निश्चितच विदर्भाची अर्थव्यवस्था बळकट होत आहे.
(४) व (५) विदर्भातील खनिजाच्या कच्च्या मालावर आधारीत विदर्भातच उद्योग उभारणीसाठी सन २०१५ ते २०२३ पर्यंत Mineral (Auction) Rules, २०१५ अन्वये आतापर्यंत एकुण ८ टप्प्यात ई-लिलावाची कार्यवाही केली असून एकुण ४१ खनिज क्षेत्रे लिलावाकरिता ठेवण्यात आलेली होती. त्यापैकी २८ खनिज क्षेत्रांची लिलावाची कार्यवाही यशस्वीरित्या पार पाडण्यात आलेली आहे. तसेच लिलावाच्या ९ व्या फेरीकरीता एकुण १९ खनिज क्षेत्रे दिनांक ०३/०२/२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहेत. या सर्व क्षेत्रांवर खनिज आधारीत उद्योग स्थापित होऊन विदर्भासह राज्यास फायदा होणार आहे.

खाणींमुळे होणारे प्रदुषण रोखण्याकरिता महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या संमतीपत्रातील अटीनुसार प्रत्येक खाणपट्टयामध्ये हवा प्रदुषण व जल प्रदुषण नियंत्रण व्यवस्था बसविलेली आहे. खाण परिसरामध्ये हवा प्रदुषण नियंत्रणाकरिता रस्त्यावर पाणी फवारणी, साईड क्ल्याडींग, फिक्स वॉटर स्प्रिंकलर, रेन गन याची व्यवस्था केली जाते. खाणीमधून निघणाऱ्या पाण्याकरिता सांडपाणी प्रक्रिया संयंत्र बसविण्यात येते. तसेच वातावरणातील हवेची गुणवत्ता तपासणी यंत्रणा बसविण्याचे कार्य महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत प्रगतीपथावर आहे.

---

**कोळविहिरे (ता.पुरंदर, जि.पुणे) येथील रस्त्यांचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(६) ५१७४१ (१९-०१-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोळविहिरे (ता.पुरंदर, जि.पुणे) येथे रेल्वेच्या कामासाठी गावाकडे जाणारे दोन्ही रस्ते मागील सहा महिन्यांपासून बंद असल्याने नागरिकांना गैरसोईला सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी रेल्वे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी ग्रामस्थांनी उपोषण व आंदोलन केले असतानाही रेल्वे विभागाकडून याबाबत दखल घेण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने माहिती घेवून उक्त रस्त्यांची अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-११-२०२३) :** (१), (२) व (३) कोळविहीर गावाकडे जाण्यासाठी दोन रस्ते असून पहिल्या रस्त्यावर Limited Height Subway निर्मितीचे काम पूर्ण झाले आहे. संबंधित Subway वापरकर्त्यासाठी खुला केला असून सद्य:स्थितीत कोळविहीर गावाला जाण्यासाठी कुठलीही अडचण नाही.

पुणे-मिरज सेक्शनच दुपदरीकरण अंतर्गत रेल्वेवरील पूल निर्मितीचे कार्य पूर्ण झाले असून संबंधित पूल वापरासाठी खुला केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मौजा कुसुंबी (ता.जिवती, जि.चंद्रपूर) येथील चुनखडी उत्खनन व बेकायदेशीर अतिक्रमणाबाबत

**(७) ५३०१९ (१९-०१-२०२३). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा कुसुंबी (ता.जिवती, जि.चंद्रपूर) येथील अल्ट्राटेक कंपनी व्यवस्थापनाकडून आदिवासी कुटुंबावर अन्याय, अत्याचार करण्यात आल्याबाबत लोकप्रतिनिधी व बाधित आदिवासी कुटुंबांनी संबंधीत विभागाकडे व मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक १६ एप्रिल, २०१८ रोजी तक्रार निवेदन देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच चुनखडी उत्खनन व अतिक्रमण याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक ११ ऑगस्ट, २०२१ व १८ फेब्रुवारी, २०२२ रोजी शासनाकडे निवेदनाव्दारे तक्रार करुन चौकशी करण्याची मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-११-२०२३) :** (१) व (२) चंद्रपूर जिल्ह्यातील कुसुंबी येथील भूसंपादन व पुर्नवसन व मुलभूत अधिकारापासून वंचित झालेल्या आदिवासी कुटुंबाना न्याय देणे व माणिकगड सिमेंट लाईम स्टोन कंपनीच्या भूसंपादन व पुर्नवसन प्रकरणाची चौकशी करुन कार्यवाही करण्यासंदर्भात, श्री.आबिद अली, अध्यक्ष, जनसत्याग्रह संघटना, मेन रोड, कोरपना, ता.कोरपना जि.चंद्रपूर यांचे तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांचे नावे आणि ठाणेदार गडचांदुर यांच्यामार्फत असे नमूद केलेले दिनांक १६/०४/२०१८ रोजीचे निवेदन, तहसिलदार कार्यालय, जिवती येथे प्राप्त झाल्याचे दिसून आले आहे.

(३), (४) व (५) खाण व खनिजे (विकसन व विनियमन) अधिनियम, १९५७ मधील तरतुदीनुसार, मौजा कुसुंबी-नोकारी, ता.राजूरा/कोरपना, जि.चंद्रपूर येथील ६४३.६२ हे. इतके चुनखडी या प्रमुख खनिजाचे क्षेत्र दिनांक ३०/०४/१९७९ च्या आदेशान्वये, मे.सेंचुरी टेक्सटाईल्स ॲड इंडस्ट्रीज लि. (माणिकगड सिमेंट कं.) यांना वाटप करण्यात आलेले आहे. उक्त क्षेत्रापैकी आज रोजी ४९३.३८ हे क्षेत्र कंपनीच्या ताब्यात आहे.

उप विभागीय अधिकारी, राजुरा तसेच महसूल विभागाच्या अहवालानुसार, कुसुंबी, ता.राजूरा जि.चंद्रपूर येथील गावकऱ्यांच्या शेतीच्या व घराच्या जागेचा ताबा घेण्यापूर्वी त्यांच्याशी विचार विनिमय करुन पुनर्वसनाऐवजी घराचा व शेतीचा मोबदला नगदी स्वरुपात वाटप केल्यानंतरच जागेच्या भूपृष्ठाचा ताबा संबंधीत कंपनीस देण्यात आला. त्यावेळी मौजा कुसुंबी येथील रहिवाशांनी पुर्नवसनाऐवजी नुकसान भरपाई मोबदला देण्यात यावा अशी मागणी केली असल्यामुळे सदर गावाचे पुर्नवसन करण्यात आले नाही आणि सर्व प्रक्रिया ही नियमानुसारच करण्यात आलेली आहे.

---

### वाघोली (जि.पुणे) या पुणे महानगरपालिकेत समाविष्ठ झालेल्या गावास पूर्ण वेळ महानगरपालिकेचा संपर्क अधिकारी व तांत्रिक अधिकाऱ्यांची नेमणुक करण्याबाबत

**(८) ५४३७८ (२७-०१-२०२३). ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाघोली (जि.पुणे) या गावाचा गत एक वर्षापूर्वी पुणे महानगरपालिका मध्ये नव्याने समावेश झालेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गावाच्या समस्या सोडविण्यासाठी संपर्क कार्यालयात पूर्ण वेळ संपर्क अधिकारी व तांत्रिक अधिकारी यांची नेमणुक करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागरिकांच्या समस्यांचे वेळेवर निराकारण होणेसाठी वाघोली येथे महानगरपालिकेच्या संपर्क कार्यालयात पूर्ण वेळ संपर्क अधिकारी व तांत्रिक अधिकारी नेमणूक करणेबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) नागरिकांच्या समस्यांचे वेळेवर निराकरण होणेसाठी वाघोली येथील संपर्क कार्यालयामध्ये पूर्णवेळ संपर्क अधिकारी व तांत्रिक अधिकारी यांची सध्यस्थितीमध्ये नेमणूक करण्यात आलेली असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे जिल्ह्यातील डोंबिवली-दिवा-कोपर-मुंब्रा स्टेशन समांतर रस्ता तयार करण्याबाबत**

**(९) ५४८८९ (१८-०१-२०२३). श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) येथील शिळफाटा रस्त्याचे काम मागील वर्षापासून सुरू असल्यामुळे, या रस्त्यावरील नागरी वस्ती वाढल्यामुळे वाहनाची सातत्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असल्याने या रस्त्याला पर्यायी मार्ग म्हणून डोंबिवली-दिवा-कोपर-मुंब्रा रेल्वे स्टेशन असा समांतर रस्ता तयार करण्यात यावा, अशा आशयाच्या मागणीचे एक सविस्तर निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कल्याण-शिळफाटा रस्त्याच्या प्रलंबित कामामुळे तसेच त्या परिसरातील वाढत्या नागरीकरणामुळे व मोठ्या प्रमाणावरील वाहनाची सातत्याने वर्दळ असल्याने होणारी वाहतूक कोंडीवरील उपाय म्हणून तत्कालीन स्थानिक लोकप्रतिनिधीनी डोंबिवली-मुंब्रा समांतर रस्ता तयार करण्याची मागणी केल्यानंतर या संदर्भात सन २००७ साली मुंबई महानगर प्रादेशिक विभागाच्या बैठकीत रस्त्याचा डीपीआर तयार करण्यासाठी ९३ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असून तत्कालीन सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा देखील करण्यात आला होता मात्र त्यावेळेस पर्यावरण विभागाची परवानगी प्रलंबित असल्याने आजमितीस सदरहू रस्ताचे काम झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, डोंबिवली, भिवंडी, उल्हासनगर, बदलापूर, अंबरनाथ व कल्याण परिसरातील नागरिकांना कल्याण-शिळफाटा रस्त्यावरच अवलंबून राहावे लागत असून या रस्त्यावर होणाऱ्या प्रचंड वाहतूक कोंडीच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे तसेच या परिसरातील वाढत्या नागरीकरणामुळे भविष्यात रस्त्यावरून पायी चालायला देखील जागा शिल्लक राहणार नाही. त्यामुळे वाहतूक कोंडीवर विनाविलंब मात करण्यासाठी डोंबिवली-मुंब्रा रेल्वे स्टेशन समांतर रस्ता तयार करणे अत्यावश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी कल्याण-शिळफाटा रस्त्याला पर्यायी मार्ग म्हणून डोंबिवली-दिवा-कोपर-मुंब्रा रेल्वे स्टेशन समांतर रस्त्याचे मागणीसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. एकनाथ शिंदे (०६-११-२०२३) :** (१) व (२) होय, अंशत: खरे आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत मुंब्रा- डोंबिवली मध्य रेल्वेला समांतर रस्ता बनविण्याचा कामासाठी १२० व्या बैठकीत मान्यता दिली असून त्यासाठी रु.९३ कोटींची तरतूद करण्यास मान्यता देण्यात आली होती.

सदर कामाचे सर्वेक्षण करून अहवाल सादर करण्यासाठी मे.मोनार्च कन्सलटंट यांना दि.२४.११.२००८ रोजी प्राधिकरणामार्फत कार्यादेश देण्यात आला होता. त्यानुसार मे.मोनार्च कन्सलटंट यांनी प्रस्तावित मार्गाची वेगवेगळया शासकीय कार्यालयाकडून माहिती व नकाशे इ. प्राप्त करून त्या आधारे आपला अहवाल प्राधिकरणाकडे सादर केला. सल्लागाराच्या अहवालानुसार मुंब्रा-डोंबिवली रस्त्यासंदर्भात खालील बाबी निदर्शनास आल्या होत्या :-

अ) प्रस्तावित मुंब्रा-डोंबिवली रस्ता हा जवळपास ७५% CRZ रेग्युलेशनमुळे बाधित आहे.

आ) प्रस्तावित मुंब्रा-डोंबिवली रस्त्याच्या मार्गात अनेक ठिकाणी कांदळवण (mangroves) झाडे तसेच अनेक प्रकारची झाडे, झुडपे अस्तित्वात आहेत.

इ) काही ठिकाणी खाजगी मालकीच्या जमिनी आहेत व त्याचे भूसंपादन करणे गरजेचे आहे.

ई) प्रस्तावित मार्गापर्यंत जाण्या-येणाऱ्यासाठी कुठुनही सोयीचा रस्ता नाही.

उ) प्रस्तावित मार्ग दलदलीचा असलेमुळे सदर मार्गातील जागेचे (जमिनीचे) सखोल सर्वेक्षण करण्यात आलेले नाही. तसेच मे. मोनार्च कन्सलटंट यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे मोठागांव डोंबिवली (प.) ते माणकोली-राष्ट्रीय महामार्ग क्र.३ (जुना) त्यातील मोठागांव, डोंबिवली (प.) ते माणकोली रस्त्याचा प्रस्ताव कमी लांबीचा व कमी खर्चाचा असल्याने या मार्गाचा विकास करण्याचे मान्य करण्यात आले आहे.

(३) प्राधिकरणामार्फत कल्याण (जि.ठाणे) येथील शिळफाटा रस्ता तसेच कल्याण बाह्यवळण रस्ता, ऐरोली कटाई नाका भाग-१, भाग-२ रस्ता, तळोजा एमआयडीसी ते खोणी रस्ता, पनवेल ठाणे राष्ट्रीय महामार्ग क्र.४ येथून खोणी रस्त्यांचे काम हाती घेण्यात आले आहे व त्यामुळे नविन रस्ते मार्गाचा विकास केल्याने कल्याण शिळफाटा रस्त्यावरील वाहतुकीचा भार कमी होण्यास मदत होणार आहे.

(४) व (५) कल्याण-शिळ रस्त्याला पर्यायी मार्ग म्हणून डोंबिवली-दिवा-कोपर मुंब्रा रेल्वे स्टेशन समांतर रस्त्याचे मागणीसंदर्भात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण स्तरावर तपासण्यात येत आहे.

---

## अहमदनगर येथील माळीवाडा येथील बसस्थानकासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत

**(१०) ५५०४४ (२२-०१-२०२३). श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर येथील माळीवाडा व तारकपूर याठिकाणी प्रवाशांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असल्याने गैरसोय होत असून सदर बसस्थानकांचे तातडीने अत्याधुनिकरण करण्यात येणार असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बसस्थानकांचे अत्याधुनिकरण करण्याबाबत बसस्थानकाची नावे प्रस्तावित केली असल्याचेही माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, माळीवाडा बसस्थानकांसाठी १६ कोटी रुपये व तारकपूर बसस्थानकासाठी ७ कोटी रुपये इतका निधी शासनाने मंजूर करुन उपलब्ध करुन देण्यात यावा, अशी लेखी स्वरुपात मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी माहे डिसेंबर, २०२१ पासून ते आजतागायत शासनाने केल्याचे निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी करण्यात आलेल्या मागणीसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-११-२०२३) :** (१), (२) व (३) होय.

(४) माळीवाडा बसस्थानकाचे आधुनिकीकरण / दर्जावाढ / वाढविस्तार / पुनर्बांधणी करणेसाठी रा.प. पॅनेलवरील वास्तुविशारद अरिन डिझाईन यांची नेमणूक केलेली आहे. तसेच जोता क्षेत्रफळावर आधारीत तारकपूर बसस्थानकाचे अंदाजपत्रक विभाग नियंत्रक रा.प.अहमदनगर यांच्याकडून मागविण्यात आलेले आहे.

---

## येरवडा (जि.पुणे) येथील रस्ता रुंदीकरण आणि पुलाची भिंत वाढविण्याच्या कामाची निविदा महानगरपालिकेकडून रद्द केल्याबाबत

**(११) ५६६५० (२४-०४-२०२३). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येरवडा (जि.पुणे) येथील पंचवटी चौकातील रस्ता रुंदीकरण आणि तारकेश्वर पुलाची भिंत वाढविण्यासाठी ठेकेदाराने बनावट कागदपत्रे सादर केल्याने सुमारे सव्वातीन कोटी रुपये रकमेची निविदा महानगरपालिकेकडून रद्द करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निविदा रद्द केल्यामुळे रस्ता रुंदीकरण आणि पुलाची भिंत वाढविण्याचे काम प्रलंबित राहिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बनावट कागदपत्रे सादर करणाऱ्या संबंधित दोषींविरुद्ध कारवाई करण्याबाबत तसेच रस्त्याच्या रुंदीकरणासह पुलाची भिंत वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-११-२०२३) :** (१) होय.
(२) होय.
सदर कामासाठी नवीन निविदा काढण्यात आली असून कार्यादेश देण्यात येत आहे.
(३) ठेकेदाराने निविदा भरताना जोडलेल्या कामाच्या दाखल्याबाबत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडे सत्यता / पडताळणीबाबत विचारणा केली असता ठेकेदाराने जोडलेला दाखला व विचारणा केल्यानुसार पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडून प्राप्त झालेला दाखला यामध्ये तफावत व भिन्नता असल्याने संदिग्धता निर्माण झाल्याने ठेकेदार यांची बयाणा रक्कम जप्त करण्यात आली असून निविदा रद्द करण्यात आली आहे. तसेच ठेकेदार व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांच्याकडून कामाच्या दाखल्याबाबत खुलासा प्राप्त झाल्यानंतर ठेकेदारावर निविदेतील अटी व शर्तीनुसार कारवाई करण्यात येणार असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रत्नागिरी-नाटे व्हाया राजवाडी तिवरे (जि.रत्नागिरी) बस आगारातील बसफेऱ्या बंद असल्याबाबत**

**(१२) ५७३४९ (२४-०४-२०२३). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी-नाटे व्हाया राजवाडी तिवरे (जि.रत्नागिरी) बस आगारातील बसफेऱ्या कोरोना काळापासून पुर्णपणे बंद असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मार्गावरील बसफेऱ्या बंद असल्यामुळे परिसरातील विद्यार्थी व ग्रामस्थांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बसफेरी पुर्वव्रत सुरु करण्याबाबत सरपंच, राजवाडी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, रत्नागिरी यांच्याकडे दिनांक ४ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने बसफेरी सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-११-२०२३) :** (१) होय.
(२), (३), (४) व (५) सदर निवेदन प्राप्त झाले आहे. नोव्हेंबर २०२२ पासून दु.१२.०० वा. रत्नागिरी नाटे फेरी व्हाया राजवाडी तिवरे मार्गे पुर्ववत चालू करण्यात आलेली आहे.
दि.३० जानेवारी, २०२३ पासुन १७.३० वाजता आडिवरे-राजवाडी-तिवरे मार्गावर नवीन फेरी सुरू करण्यात आलेली आहे.

---

**परभणी-सेलू (जि.परभणी) मार्गावरील एस.टी. बसच्या**
**फेऱ्यामध्ये कपात केल्याबाबत**

**(१३) ५७८५८ (२५-०४-२०२३). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी-सेलू (जि.परभणी) मार्गावरुन नियमित धावणाऱ्या एस.टी. बसच्या फेऱ्यामध्ये परभणी आगाराने कपात केल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर फेऱ्यांमध्ये कपात केल्यामुळे या मार्गावरील प्रवासी आणि विशेषतः विद्यार्थींची गैरसोय होत असून विद्यार्थ्यांना शाळा व महाविद्यालयात जाण्यासाठी रोज उशीर होत असून त्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी एस.टी.बसच्या फेऱ्या कमी करण्याची कारणे काय आहेत त्यानुषंगाने व बसच्या सेवा पूर्वव्रत सुरु करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-११-२०२३) :** (१) होय.

(२), (३) व (४) नाही.

परभणी ते सेलु मार्गावर प्रवासी व विद्यार्थींच्या सोयी नुसार दैनंदिन २४ फेऱ्या चालनात आहेत.

परभणी ते सेलु मार्गावर प्रवाशी उत्पन्नात घट झाल्याने, कमी भारमानामुळे फेऱ्यांची संख्या कमी करण्यात आली असून वारंवारीत प्रती तास एक फेरी याप्रमाणे फेऱ्या चालविण्यात येत आहेत. परंतु प्रवासी व प्रामुख्याने विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार शालेय तसेच महाविद्यालयीन वेळामध्ये अतिरिक्त फेऱ्या सुरु करण्यात येत आहे. प्रवासी व विद्यार्थी यांची कोणतीही गैरसोय होणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे.

---

**मलकापूर (जि.बुलढाणा) येथे आगाराच्या नवीन इमारत**
**बांधकामासह सोयी सुविधा पुरविण्याबाबत**

**(१४) ५८०३५ (२६-०४-२०२३). श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर (जि.बुलढाणा) येथील बस आगाराची इमारत पूर्णपणे निकामी झाल्यामुळे जुनी इमारत पाडून त्या ठिकाणी नवीन इमारतीचे बांधकाम करणे व फलाटाची संख्या वाढविण्याबाबतचे लेखी निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधीनी शासनास दिनांक २७ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने सदर इमारतीच्या नवीन बांधकामास मंजूरी देऊन बांधकाम लवकर पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-११-२०२३) :** (१) होय.

(२) व (३) मलकापूर येथील बसस्थानकाच्या पुर्नबांधणीसाठी नोंदवही क्र.९५७ दि.०८.०८.२०२२ नुसार रु.२००.०० लक्ष प्रशासकीय मंजुरी शासन निधी अंतर्गत प्रदान करण्यात आली होती. सदर कामाकरीता वास्तुविशारद यांची नेमणूक करण्यात आली आहे.

---

**वांद्रे (मुंबई) येथील वांद्रे-कुर्ला-संकुलातील रस्त्याच्या आकार लहान करून सायकलिंग ट्रक उभारल्याबाबत**

**(१५) ५९१०२ (२४-०४-२०२३). श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वांद्रे येथील वांद्रे-कुर्ला-संकुलातील मध्ये रस्त्याच्या आकार लहान करून त्या ठिकाणी करोडो रुपये खर्च करून सायकलिंग ट्रॅक उभारण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सायकलिंग ट्रॅकचा काहीच उपयोग होत नसून रस्ता लहान झाल्यामुळे वाहतुकीची कोंडी होत असताना याकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, करोडो रुपये खर्च करून कारण नसतानाही सायकलिंग ट्रॅक उभारण्यात आल्याबाबत चौकशी करून शासनाचे कोट्यावधी रुपये खर्च झाल्याने संबंधित दोषीवर कारवाई करण्याबाबत तसेच सायकलिंग रस्ता काढून वाहतुकीची कोंडी दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-११-२०२३) :** (१) हे अशत: खरे आहे.

वांद्रे-कुर्ला संकुल हे प्रमुख व्यावसायिक केंद्र असल्याने येथे मुख्य रस्त्यावर वाहनांची प्रचंड गर्दी होत आहे. सदर वाहनांच्या गर्दीमुळे प्रवासाच्या वेळेत तसेच प्रदूषणामध्ये वाढ होत असून पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. या दृष्टीने पर्यावरण स्नेही वाहतुकीचा उपाय म्हणून पादचारी तसेच इंजिनविरहीत वाहनांना (Non Motorized Transport System) चालना देणे गरजेचे आहे. त्यास अनुसरुन वांद्रे-कुर्ला संकुलात सायकल ट्रॅकची अंमलबजावणी केली आहे. सदर प्रकल्पातर्गत जंक्शन सुधारणा, फुटपाथ रुंदीकरण व Sharable Cycle Track ची उभारणी करण्यात आली.

सदर सायकल ट्रॅक हा रोड लेवलवर असलेल्या पुर्वीच्या सायकल ट्रॅकवरच उभारला आला असल्याने होणारे बेकायदेशीर कार पार्किंग हटविणे शक्य झाले आहे. तसेच सद्यस्थितीस वाहतुकीसाठी पुर्वीप्रमाणेच दोन लेन उपलब्ध आहेत.

(२), (३) व (४) सदर सायकल ट्रॅकमुळे वाहतुकीची कोंडी होत नसून सद्यस्थितीत वांद्रे कुर्ला संकुलामध्ये सुरु असलेल्या मेट्रोच्या कामाचे बॅरिकेटस् काढल्यानंतर सर्व लेन्स वाहतुकीकरीता पुर्ववत करुन वाहतुकीची कोंडी निश्चित कमी होईल. तसेच वांद्रे कुर्ला संकुलातील मेट्रो कार्यरत झाल्यानंतर रस्त्यावरील वाहतुक कोंडी कमी होईल. तसेच सद्यस्थितीत वांद्रे-कुर्ला संकुलामध्ये इतर कारणांमुळे होणारी वाहतुक कोंडी कमी करण्याकरीता प्राधिकरणामार्फत विविध उपाययोजना करुन योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.

मागील दोन वर्षात संकुलात बीकेसी जोडरस्त्यामुळे (BKC Connector) वाहतुकीचे प्रमाण वाढले असून एसटी, बसेस, बेस्ट तसेच इतर खाजगी बसेस सुद्धा बीकेसी जोडरस्त्याचा वापर करीत आहेत. ज्यामुळे वाहतुक कोंडी होण्याचे प्रमाण वाढले आहे. सायकल ट्रॅक हा पुर्णपणे शेअरेबल असून सदर सायकलिंग ट्रॅकचा वापर करण्याकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत वांद्रे कुर्ला संकुलामध्ये २५ समर्पित जागेवर सुमारे ५०० ई-बाईक्स व सायकल उपलब्ध करण्यात आले आहेत. आजतागयत सुमारे ५ लाख सायकलच्या फेऱ्या सुमारे ३ लाख प्रवाशांमार्फत करण्यात आलेल्या आहेत.

तसेच सायकलिंग ट्रॅकचा वापर नजीकच्या काळात वांद्रे कुर्ला संकुलामध्ये उभारण्यात येणाऱ्या मेट्रो स्थानक, बुलेट ट्रेन स्थानक ह्यामधील प्रवाशांना अंतिम गंतत्य स्थानापर्यंत वाहतूक सेवा (Last Mile Connectivity) पुरविण्याच्या उद्देशाने उभारण्यात होणार आहे.

## धुळे-मुंबई स्वतंत्र रेल्वेसेवा सुरु करण्याबाबत

**(१६) ५९६६५ (२२-०४-२०२३). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे येथून दररोज हजारो प्रवासी मुंबई, पुणे व इतर ठिकाणी प्रवास करत असून त्यांना जाण्या-येण्यासाठी धुळे येथून कोणतीही रेल्वेसेवा सुरू नसल्याचे दिनांक ७ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धुळे येथून मुंबई व इतर ठिकाणी जाण्यासाठी स्वतंत्र रेल्वे बोगी (कोचेस) सुरू करावी अशी मागणी धुळे येथील नागरिकांकडून करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुंषगाने धुळे-मुंबई करिता दररोज स्वतंत्र रेल्वेसेवा सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२३-११-२०२३) :** (१), (२) व (३) मध्य रेल्वेने राज्य शासनास दिलेल्या माहितीनुसार, धुळे याठिकाणी रेल्वे देखभाल सुविधा नाही तसेच चाळीसगाव पासून मुंबई व पुणे क्षेत्रात स्टेबलिंग लाईन, प्लॅटफॉर्म यासंदर्भात गंभीर अडथळे आहेत. यामुळे नवीन रेल्वे सुरु करणे शक्य नाही.

धुळे ते मुंबई प्रवास करण्यासाठी धुळे-दादर-धूळे रेल्वेगाडी आठवड्यातुन तिनदा चालवण्यात येत आहे. तसेच सध्या चाळीसगाव ते मुंबई ७ रेल्वेगाड्या आणि चाळीसगाव ते पुणे ५ रेल्वेगाड्या उपलब्ध आहेत. त्यामुळे धुळे-चाळीसगाव-धुळे या ट्रेनच्या माध्यमातून धुळयापासून मुंबई व पुणे याठिकाणी जाण्यासाठी सुविधा उपलब्ध आहे.

तसेच रेल्वे बोर्डाच्या प्रचलित धोरणानुसार स्वतंत्र कोचेस सेवा बंद करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे महानगरपालिकेच्या वडगाव बुद्रूक शाळेतील स्वच्छतागृहाची झालेली दुरवस्था

**(१७) ५९७६३ (२२-०४-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या वडगाव बुद्रूक येथील कै.बबनराव जाधव या शाळेतील स्वच्छतागृहाची दुरवस्था झाली असून त्यामुळे विद्यार्थी-विद्यार्थींनी यांची गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोडकळीस आलेले दरवाजे, स्वच्छतेअभावी विद्यार्थ्यांची गैरसोय कायम असल्याने विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने माहिती घेऊन येथील शाळेचे नव्याने बांधण्यात आलेल्या इमारतीचे तातडीने स्थलांतर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-११-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) मोडकळीस आलेले दरवाजे दुरूस्त करून घेण्यात आले असून शौचालयाची साफसफाई व स्वच्छता करण्यात आल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होणार नाही याची दक्षता घेण्यात आलेली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे खरे नाही.

(३) पुणे महानगरपालिकेच्या वडगाव बुद्रुक येथील कै. बबनराव जाधव या शाळेत शाळा क्र.२०३ बी इंग्रजी माध्यम, २०३ बी मराठी माध्यम व १०० जी मराठी माध्यम अशा एकूण ३ शाळा भरत होत्या. तेथील स्वच्छतागृह व इतर सोयी सुविधा कमी पडत असल्याने या तीन शाळांपैकी मनपा शाळा क्र. २०३ बी इंग्रजी माध्यम नव्याने बांधण्यात आलेल्या इमारतीमध्ये स्थलांतर करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे महानगरपालिकेच्या समान पाणीपुरवठा योजनेबाबत**

**(१८) ६०१२२ (२४-०४-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेने समान पाणीपुरवठा योजनेतंर्गत नवीन जलवाहिनी टाकण्यासह सर्व भागात समान पाणी देता यावे यासाठी ८२ पाणी टाक्यांचे नियोजन केले असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेचे काम सन २०१७ मध्ये सुरु झाल्यानंतर आतापर्यंत ४२ टाक्यांना जागा मिळून त्या पूर्ण झाल्या आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उर्वरित पाणीटाक्या बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-११-२०२३) :** (१) होय.

(२) होय. सद्यपरिस्थितीत ४३ टाक्यांची कामे पूर्ण झालेली आहेत.

(३) एकूण ८२ टाक्यांपैकी ४३ टाक्यांची कामे पूर्ण झालेली आहेत. २१ टाक्यांची कामे सुरू आहेत. वन विभाग व संरक्षण विभाग यांचे ना-हरकत प्रमाणपत्र मिळण्यास झालेला विलंब तसेच हद्दीचा वाद, न्यायालयीन दावे, स्थानिक अडचणी, मेट्रोची कामे इत्यादीमुळे १८ टाक्यांच्या बांधकामासाठी जागा मिळण्यास विलंब झालेला आहे. यामुळे सदर १८ टाक्यांचे काम करण्यास ठेकेदाराने नकार दिला आहे. त्यापैकी ५ टाक्यांच्या क्षमता इतर लगतच्या टाक्यांमध्ये समायोजित करण्यात आलेल्या आहे. ११ टाक्यांच्या नव्याने निविदा मागविण्यात आल्या आहेत. त्यापैकी ३ टाक्यांची कामे जागेवर सुरू आहेत व उर्वरित निविदा प्रक्रियेत आहेत. २ टाक्या बांधण्याकरिता सद्यस्थितीत पर्यायी जागा उपलब्ध करून घेण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) वन विभाग व संरक्षण विभाग यांचे नाहरकत प्रमाणपत्र मिळण्यास झालेला विलंब, हद्दीचा वाद, न्यायालयीन दावे, स्थानिक अडचणी, मेट्रोची कामे, कोविड-१९ ची साथ तसेच काही टाक्यांचे काम करण्यास ठेकेदाराने विलंब केल्यामुळे टाक्यांची कामे करण्यास विलंब झालेला आहे. ठेकेदाराने काम करण्यात केलेल्या विलंबामुळे त्याच्या बिलामधून रक्कम रू. १,१३,३१,९२८/- इतका दंड करण्यात आलेला आहे.

---

## परभणी महानगरपालिकेने थकीत मालमत्ता कराच्या वसूलीसाठी वीज परिक्षण कार्यालयास सील ठोकल्याबाबत

**(१९) ६०४४० (११-०५-२०२३). श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी महापालिकेने थकीत मालमत्ता कराच्या वसूलीसाठी मोहीम सुरु केली असून दिनांक २३ जानेवारी, २०२३ रोजी जुना पेन्शन रस्त्यावरील वीज परिक्षण कार्यालयास सिल ठोकण्यासाठी अधिकारी पाठविण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कार्यालयाकडे १० लाख ५७ हजार ५१४ रुपयांचा मालमत्ता कर थकीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हा मालमत्ता कर भरण्याची या कार्यालयाची आर्थिक स्थिती नसल्याने त्यांना खास बाब म्हणून सदर कर माफ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-११-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

सदर कार्यालयाकडे दिनांक २३ जानेवारी, २०२३ रोजी थकीत व चालू मालमत्ता कर रु.६,६१,१०४/- व विलंबशास्ती रु.३,९६,४१०/- असे एकूण रु.१०,५७,५१४/- थकीत होते.

(३) बीज परिक्षण प्रयोगशाळा परभणी या कार्यालयाने मालमत्ता करापोटी दिनांक २४ फेब्रुवारी, २०२३ रोजी रु.५,९५,०३८/- व दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ रोजी रु.६६,०६६/- अशी एकूण रु.६,६१,१०४/- कराचा भरणा केला आहे.

दिनांक २४ फेब्रुवारी, २०२३ रोजी बीज परीक्षण अधिकारी यांच्या कक्षाचे सील काढण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर उत्तर येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेअंतर्गत निधी मिळण्याबाबत

**(२०) ६०७२५ (२५-०४-२०२३). श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर उत्तर येथील अनुसूचित जाती जमाती बहुल क्षेत्राचा विकास करण्यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेतून सुमारे २ कोटी निधी मिळावा याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २२ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास सामाजिक न्याय मंत्री यांचेकडे मागणी केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने विकास कामासाठी तात्काळ निधी उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-११-२०२३) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे, याबाबत मा.श्रीमती जयश्री जाधव, विधानसभा सदस्य यांनी दिनांक १७ सप्टेंबर, २०२२ रोजी अशा प्रकारची मागणी केली होती.

(२) उपरोक्त प्रस्ताव मा.मुख्यमंत्री महोदयांकडे मान्यतेकरिता सादर करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर महानगरपालिकेचे स्वतःचे धरण बांधण्याबाबत**

**(२१) ६०९२९ (२४-०४-२०२३). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेने कन्हान व कोलार नद्यांच्या संगमावर स्वतःच्या मालकीचे धरण बांधण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर शहराची वाढत्या लोकसंख्येचा विचार करता व निर्माण होणाऱ्या गंभीर पाणी प्रश्नाचा विचार करता नागपूर महानगरपालिकेचे स्वतःचे धरण बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-११-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) नागपूर महानगरपालिकेचा पाणीपुरवठा करण्यास्तव कन्हान नदीवर बॅरेज उभारण्याची मागणी लक्षात घेता, बॅरेजचा सविस्तर प्रकल्प अहवाल जलसंपदा विभागामार्फत तयार करण्यांत आला आहे. राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांची शिफारस प्राप्त करून प्रशासकीय मान्यतेबाबत कार्यवाही करण्याकरीता विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर कार्यालयाकडून महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण कार्यालयास दि. १८.०८.२०२३ रोजी प्रस्ताव सादर करण्यांत आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे महानगरपालिकेतील हिरकणी कक्ष बंद असल्याबाबत**

**(२२) ६१६७४ (२४-०४-२०२३). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेतील मुख्य इमारतीतील महिला कर्मचारी तसेच महानगरपालिकेत कामानिमित्त येणाऱ्या महिला नागरिक यांच्यासाठी सन २०१६ मध्ये स्थापन केलेला हिरकणी कक्ष बंद असल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या हिरकणी कक्षासाठी महानगरपालिकेतील इमारतीतील तिसऱ्या मजल्यावरील वडके सभागृहाशेजारी जागा द्यावी अशी मागणी समाजविकास विभागाने मालमत्ता व्यवस्था विभागाला पत्र देवूनही सदरहू जागा उपब्ध करुन देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले व तदनुसार उक्त महानगरपालिकेत हिरकणी कक्ष पूर्वव्रत सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-११-२०२३) :** (१) सन २०१६ मध्ये पुणे मनपाच्या जुन्या इमारतीच्या पश्चिम बाजूस तळ मजल्यावर हिरकणी कक्षाची स्थापना करण्यात आली असून जानेवारी २०२३ दरम्यान वापर बंद होता. परंतु जून २०२३ दरम्यान सदर हिरकणी कक्षाचा वापर सुरू करण्यात आला आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ ते पश्चिम द्रुतगती मार्ग जंक्शनवरील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी भुयारी मार्ग बांधण्याबाबत

**(२३) ६२९५३ (२४-०४-२०२३). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ ते पश्चिम द्रुतगती मार्ग जंक्शनवरील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी ८१० मीटर लांबीचा भुयारी मार्ग बांधला जाणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याकरिता किती निधीची तरतूद करण्यात आली आहे व त्याकरिता निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, सदर कामाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे व सदरहू कंत्राट कोणत्या कंत्राटदारास देण्यात आले आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ ते पश्चिम द्रुतगती मार्ग जंक्शनवरील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी सुधारीत व्याप्ती बदलानुसार ५४५ मी. भुयारी मार्ग बांधला जाणार आहे.

(२) सदरहू कामासाठी रु.१५१.९२ कोटी इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदरहू काम हे EPC पध्दतीचे आहे. सदर कामाचे कंत्राट मे.आर. पी. एस. इन्फ्राप्रोजेक्टस प्रा.लि. यांना देण्यात आले होते. परंतु, जागेची उपलब्धता व इतर अडथळयामुळे कामाच्या व्याप्तीमध्ये बदल होऊन कामाची किंमत कमी झाल्याने कंत्राटदारास मान्य नसल्यामुळे नकार देण्याचा पहिला अधिकार या तत्वावर द्वितीय बोलीची निविदा मागविण्यात आली असून, सदर निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

(३) दहिसरकडे जाणाऱ्या भुयारी मार्गाची लांबी ५४५ मी. असून रुंदी ७ मी. आहे. सदर कामांसाठीची द्वितीय बोलीची निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे महानगरपालिका यांनी भाडेतत्वावर दिलेल्या भूखंडाबाबत

**(२४) ६२९८९ (१२-०५-२०२३). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेने स्वमालकीची किती व्यावसायिक संकुले, आस्थापना महानगरपालिकेच्या जागा वाटप नियमावलीनुसार सामाजिक व व्यावसायिक संस्थांना भाडेतत्त्वावर दिलेल्या असल्याचे निदर्शनास आले आहे,

(२) असल्यास, आतापर्यंत किती संस्थांना भूखंड भाडेतत्वावर देण्यात आला असून, किती संस्थांनी महानगरपालिकेचे भाडे तत्त्वापोटी येणारा महसूल थकविला आहे,

(३) असल्यास, विविध आरक्षण हेतू विकसित करताना व अन्य कारणास्तव महानगरपालिकेच्या ताब्यात किती सदनिका आलेल्या आहेत,

(४) असल्यास, शाळा, रुग्णालयासाठी प्रदीर्घ काळ सामाजिक हेतूने भाडे तत्वावर विकसित करावयास दिलेले भूखंड सदर संस्थांनी विकसित न केल्याबाबत महानगरपालिकेने किती प्रकरणी कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-११-२०२३) :** (१) एकूण-२४३ व्यावसायिक संकुले भाडेतत्वावर देण्यात आली आहेत.

(२) एकूण ८२ संस्थांना भाडेतत्वावर भूखंड देण्यात आले आहे. एकूण थकबाकीदारांची संख्या-८२ आहे

(३) महानगरपालिकेच्या ताब्यात आलेल्या एकूण सदनिका-३९४०

(४) अशी बाब उद्भवलेली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिक जिल्ह्यातील चांदवड शहरात अग्निशमन दल नसल्याबाबत

**(२५) ६३०९६ (२४-०४-२०२३). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदवड (जि.नाशिक) शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत असून तसेच सन २०१५ मध्ये चांदवड नगरपरिषद होऊनही सदर ठिकाणी अद्यापपर्यंत अग्निशमन दलच कार्यरत नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एखादी आगीची घटना घडल्यास चांदवड येथील सोमा टोल कंपनीच्या अग्निशमन बंबावर चांदवडकरांना अवलंबून राहावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच चांदवड शहरात आगीची घटना झाल्यास मनमाड, मालेगाव, पिंपळगाव येथील अग्निशमन दलाला पाचारण कराव लागते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, चांदवड शहराकरीता तात्काळ अग्निशमन दल मंजूर करून कार्यरत करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-११-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे आहे.

चांदवड नगरपरिषदेस जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत अग्निशमन वाहन पुरविण्याकरीता मे.निधी एंटरप्रायजेस यांना दि.२८.०७.२०२३ रोजी कार्यादेश देण्यात आला होता. त्यानुसार त्यांनी दि.२२.०८.२०२३ रोजी अग्निशमन वाहन चांदवड नगरपरिषदेस उपलब्ध करुन दिले आहे.

(४) चांदवड नगरपरिषदेस जिल्हा वार्षिक योजनेतून अग्निशमन वाहन उपलब्ध झाले असून, याकरीता आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने, स्थानिक कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. तसेच चांदवड नगरपरिषद अग्निशमन सेवा संवर्गातील गट क (श्रेणी-क) चे १ पद मंजूर करण्यात आले आहे.

अग्निशमन सेवा संचालनालयाच्या दि.०६ मे, २०२१ रोजीच्या परिपत्रकानुसार राज्यातील ड-वर्ग महानगरपालिका, सर्व नगरपरिषदा व सर्व नगरपंचायती यांच्या अग्निशमन सेवा सक्षम करण्याकरीता त्यांना शासनाकडून अनुदान मंजूर करण्यात येते. त्यानुषंगाने चांदवड नगरपरिषदेमार्फत सविस्तर प्रकल्प अहवाल (डी.पी.आर.) सादर करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई, पुणे व नागपूरसह राज्यातील इतर मेट्रो रेल्वे स्थानकांवर स्थानिक भूमीपुत्रांना स्वयंरोजगाराच्या संधीमध्ये आरक्षण देण्याबाबत

**(२६) ६३५४६ (२४-०४-२०२३). श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, पुणे व नागपूरसह राज्यातील इतर मेट्रो रेल्वे स्थानकांवर स्थानिक भूमीपुत्रांना स्वयंरोजगाराच्या संधीमध्ये आरक्षण देण्यात यावे अशी मागणी स्थानिकांनी तसेच लोकप्रतिनिधी यांनी लेखी निवेदनाद्वारे शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने स्थानिक भूमीपुत्रांना स्वयंरोजगाराच्या संधीमध्ये आरक्षण देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) राज्यातील मेट्रो प्रकल्प हे उच्च भांडवली गुंतवणूक असलेले प्रकल्प आहेत. सदर प्रकल्पामधुन मिळणारे गैर महसूली उत्पन्न प्रकल्पाचा देखभाल खर्च व कर्जाच्या परतफेडीसाठी वापरण्यात येणार आहे. सबब, सदर प्रकल्पामध्ये जास्तीत जास्त महसूल मिळवण्याच्या हेतूने खुल्या निविदा प्रक्रियेने निविदा काढण्यात येत असून, त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे आरक्षण ठेवण्यात आलेले नाही.

---

**जामसंडे (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) येथील अनधिकृत बांधकाम प्रकरणी कारवाई करतांना जिल्हा प्रशासनाकडून पक्षपातीपणा करण्यात येत असल्याबाबत**

**(२७) ६४६७६ (२४-०८-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जामसंडे (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) नगरपंचायतच्या एका नगरसेवकावर अनधिकृत बांधकाम केल्याप्रकरणी जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांनी त्यांना नगरसेवक पदावरुन माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान अपात्र केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दुसरीकडे वाभवे-वैभववाडी नगरपंचायतमधील सत्ताधारी दोन नगरसेवकांच्या अनधिकृत बांधकामांबाबत दिनांक १० मे, २०२२ रोजी तक्रार करण्यात येऊनही अद्यापपर्यंत त्यांच्यावर कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अनधिकृत बांधकाम प्रकरणी कारवाई करतांना जिल्हा प्रशासनाकडून पक्षपातीपणा करण्यात येत असून राजकीय दबावाखाली देवगड-जामसंडे प्रकरणात तातडीने कारवाई करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन वाभवे-वैभववाडी अनधिकृत बांधकाम प्रकरणातील दोषी नगरसेवकांवर व कारवाई करतांना पक्षपातीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-११-२०२३) :** (१) हे खरे आहे. तथापि, जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांचा दि.११/०४/२०२३ रोजीचा आदेश मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि.२५/०४/२०२३ रोजी रद्द (Set aside) केला आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) याप्रकरणी महाराष्ट्र नगरपरिषदा/ नगरपंचायती, औद्योगिकनगरी अधिनियम, १९६५ चे कलम ४४ (१) (ई) नुसार जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांचेकडे सुनावणी सुरु आहे. सुनावणीअंती याप्रकरणी नियमोचित कार्यवाही करण्याचे नगरपरिषदेचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खालापूर (ता.खालापूर, जि.रायगड) नगरपंचायतीत झालेला आर्थिक गैरव्यवहार**

**(२८) ६४९०३ (२५-०८-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खालापूर (ता.खालापूर, जि.रायगड) नगरपंचायतीत मोठया प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झाला असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नगरपंचायतीत निधी अभावी पाणी तसेच मुलभुत सुविधांकडे दुर्लक्ष होत असताना नागरिकांनी कर रूपात भरलेली सुमारे साडेपाच लाखांची रक्कम कर्मचाऱ्यांनी परस्पर वापरुन गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त नगरपंचायतीतील कराची रक्कम बँकेच्या खात्यात न भरता वैयक्तिक कारणाकरीता वापरली असल्यामुळे कर्मचाऱ्याला नोटीसही बजावण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार खालापूर नगरपंचायतीत आर्थिक गैरव्यवहार करणाऱ्या कर्मचाऱ्याविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-११-२०२३) :** (१) व (२) नगरपंचायतीमधील कर्मचाऱ्याने निधीचा गैरव्यवहार केला आहे. तथापि, निधीअभावी पाणी तसेच मुलभूत सुविधांकडे दुर्लक्ष झालेले नाही.
(३) हे खरे आहे.
(४) प्रस्तुत गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी नगरपंचायत स्तरावर चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. चौकशीअंती आर्थिक अपहार झाल्याचे निष्पन्न झाल्याने संबंधित कर्मचाऱ्यास निलंबित करण्यात आले असून त्याची वेतनवाढ रोखण्यात आली आहे. गैरव्यवहार केलेली संपूर्ण रक्कम दोषी कर्मचाऱ्याने नगरपंचायत फंडामध्ये जमा केली असून सदर घटनेची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून संबंधिताची बदली अन्य विभागात करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे लासलगाव व विंचूर (ता.निफाड, जि.नाशिक) येथील नदीवरील जलाशयांचे संवर्धनासाठी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत

**(२९) ६५०३७ (३१-०८-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे लासलगाव व विंचूर (ता.निफाड, जि.नाशिक) येथील नदीवरील जलाशयाचे संवर्धनासाठी राज्य सरोवर संवर्धन योजनेमधून प्रशासकीय मान्यता मिळण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २३ मार्च, २०२३ व दिनांक १६ मार्च, २०२३ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक १७ मार्च, २०२२ रोजी राज्य नदी संवर्धन योजनेच्या सचिव प्रदत्त समितीने लोणगंगा नद्यांच्या जलाशयाचे संवर्धनासाठी, राज्य सरोवर संवर्धन योजनेसाठी नदी संवर्धनाचा परिपूर्ण प्रस्ताव नाशिक जिल्हा परिषदेने पाठवावा असा निर्णय घेतल्यानंतर, नाशिक जिल्हा परिषदेने दिनांक १८ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या पत्रान्वये प्रदत्त समितीच्या निर्देशाप्रमाणे परिपूर्ण सुधारित प्रस्ताव शासनास सादर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार उक्त ठिकाणच्या नदीवरील जलाशयाचे संवर्धनासाठी राज्य सरोवर संवर्धन योजनेमधून प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-११-२०२३) :** (१) मौजे लासलगाव व विंचूर (ता.निफाड, जि.नाशिक) येथील नदीवरील जलाशयाचे संवर्धनासाठी राज्य सरोवर संवर्धन योजनेमधून प्रशासकीय मान्यता मिळण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि.२० फेब्रुवारी, २०२३ व दि.२२ मे, २०२३ रोजीच्या पत्रान्वये शासनाकडे केलेली आहे.

(२) व (३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक यांच्या दि.१८.०२.२०२३ रोजीच्या पत्रासोबत शिवनदी व लोणगंगा नदीवरील जलाशयाचे संवर्धन करण्याचे प्रस्ताव विभागास प्राप्त झाले असून सदर प्रस्ताव दि.०४.०८.२०२३ रोजी झालेल्या सचिव स्तरावरील प्रदत्त समितीसमोर मान्यतेस्तव सादर करण्यात आले होते. सदर प्रस्तावांना समितीने सुचविलेल्या सुधारणांच्या समावेशासह सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची तांत्रीक मान्यता तातडीने सादर करण्याच्या अटीच्या अधीन राहून तत्वत: मान्यता दिलेली आहे. तथापि, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. नाशिक यांचेकडून सविस्तर प्रकल्प अहवाल (तांत्रिक मान्यतेसह) अद्याप अप्राप्त आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सिंधुदुर्ग जिल्ह्यात नगरपंचायत स्थापन करण्याबाबत**

**(३०) ६५२८२ (२५-०८-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्गनगरी हे जिल्हा मुख्यालयाचे ठिकाण असून नियमानुसार येथे नगरपंचायत स्थापन होणे आवश्यक असतांनाही येथे अद्यापपर्यंत नगरपंचायत निर्मिती करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिंधुदुर्गनगरी नगरपंचायत निर्मितीबाबत वारंवार स्थानिक नागरीकांकडून मागणी करुनही त्याकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने तात्काळ निर्णय न घेतल्यास ०१ मे, २०२३ रोजीपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरु करण्याचा इशारा स्थानिक रहिवाशी यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री यांना माहे एप्रिल, २०२३ मध्ये दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने सिंधुदुर्गनगरी नगरपंचायतीची स्थापना करण्याच्या अनुषंगाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-११-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) अशा आशयाचे निवेदन जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांचेकडे प्राप्त झाले, ही वस्तूस्थिती आहे.
(४) जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी मोठया प्रमाणात पायाभुत सुविधांची उभारणी करण्यासाठी, तसेच विकासाला गती देण्यासाठी ओरोस बुद्रुक, अणाव व रानबांबुळी या गावांचा समावेश करुन ओरोस (सिंधुदुर्गनगरी) येथे नगरपंचायत स्थापन करण्याच्या अनुषंगाने “प्रारुप अधिसूचना” दि.२५ जानेवारी, २०१६ रोजीच्या राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य परिवहन महामंडळाच्या ठरावांना मंजूरी देण्याबाबत**

**(३१) ६५४५८ (३१-०८-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळाची ३०२ वी सर्वसाधारण सभा महामंडळाचे अध्यक्ष तथा राज्याचे मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २९ नोव्हेंबर, २०२२ रोजी झाली, या बैठकीत ऐन वेळेस आलेल्या विषयासह जवळपास ५७ ठरावांना मंजूरी देण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठरावात ५१५० इलेक्ट्रीक बस भाडेतत्वावर घेणे, एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना सुधारीत वेतनश्रेणी देणे, कर्मचाऱ्यांचे गणवेश भत्ते व इतर महत्वाचे विषय अंतर्भूत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या ठरावावर मंजूरीसाठी एसटी महामंडळाचे अध्यक्ष या नात्याने राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी स्वाक्षरी केली नसल्याची बाब एसटी महामंडळाचे अमृत महोत्सवाच्या कार्यक्रमाचे वर्ष साजरे करीत असताना निदर्शनास आल्याने एसटी कर्मचाऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण पसरले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर ठरावाबाबत धोरण आखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-११-२०२३) :** (१) राज्य परिवहन महामंडळाची ३०२ वी संचालक मंडळाची बैठक महामंडळाचे अध्यक्ष तथा मुख्यमंत्री (परिवहन) यांचे अध्यक्षतेखाली दि.१८ नोव्हेंबर, २०२२ रोजी पार पडली. सदर बैठकीत एकूण ३२ ठरावांवर चर्चा करण्यात आली.
(२) ५१५० इलेट्रिक बसेस भाडेतत्वावर घेणे, अधिकाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणी देणे यासह इतर एकूण ३२ विषयांवर चर्चा करण्यात आली.
(३), (४) व (५) मा.मुख्यमंत्री यांनी संचालक मंडळाच्या ३०२ व्या बैठकीच्या इतीवृत्तास मंजूरी दिल्यानंतर ठरावानुसार कार्यवाही सुरू आहे.

---

**नांदेड येथील महानगरपालिकेतील कंत्राटी सफाई कामगारांना किमान वेतन, आरोग्य विमा, अपघात विमा, सुरक्षा साहित्य मिळत नसल्याबाबत**

**(३२) ६५४६१ (२८-०८-२०२३). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड येथील महानगरपालिकेच्या कंत्राटी सफाई कामगारांना किमान वेतन, आरोग्य विमा, अपघात विमा, सुरक्षा साहित्य मिळत नसल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात शासनाने माहिती घेवून या कामगारांना किमान वेतन, आरोग्य विमा, अपघात विमा व इ. लाभ देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-११-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.

घनकचरा व्यवस्थापनाच्या कामासाठी लावण्यात आलेल्या सर्व कंत्राटी (स्त्री व पुरुष) सफाई कामगारांना किमान वेतन अधिनियम १९४८ अन्वये नियुक्त कंत्राटदारामार्फत वेतन प्रदान केले जाते.

तसेच संबंधित कंत्राटदारामार्फत कंत्राटी सफाई कामगारांना आरोग्य विमा व अपघात विमा (EPF व ESIC) देण्यात येत आहे.

कंत्राटी सफाई कामगारांना आवश्यक सुरक्षा साहित्य मास्क,गमबुट, हॅण्डग्लोज, रेनकोट, गणवेश/साड्या व ओळखपत्र इत्यादी संबंधित कंत्राटदारामार्फत वितरीत करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर विभागातील एसटीच्या मार्ग तपासणी पथकातील कर्मचाऱ्यांच्या बदलींबाबत

**(३३) ६५५७४ (२८-०८-२०२३). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एसटी महामंडळाच्या मुंबई मुख्यालयातील वाहतुक व्यवस्थापकांनी मार्ग तपासणी पथकातील सर्व कर्मचाऱ्यांची दर तीन वर्षांनी बदली करण्यात यावी असा आदेश काढला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चार महिने उलटूनही उक्त आदेशानुसार नागपूर विभागात कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर कर्मचाऱ्यांच्या तातडीने बदल्या करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-११-२०२३) :** (१) होय.

(२), (३) व (४) रा.प.नागपूर विभागात मार्ग तपासणी पथकात ३ वर्षापेक्षा जास्त कार्यकाळ कामगिरी केलेल्या ३ वाहतूक नियंत्रकापैकी दोघांची अन्यत्र बदली करण्यात आली असून एका वाहतूक नियंत्रकास सेवानिवृत्तीकरीता ६ महिने शिल्लक असल्यामुळे त्यांची बदली करण्यात आलेली नव्हती. सद्यस्थितीत ते सेवानिवृत्त झालेले आहेत. तसेच मार्गतपासणी पथकात ३ वर्षापेक्षा जास्त कार्यकाळ कामगिरी केलेले २ वाहतूक निरीक्षकांपैकी १ महिला वाहतूक निरीक्षक प्रसूती रजेवर असल्यामुळे त्यांची बदली करण्यात आलेली नव्हती. परंतू आता त्यांच्या बदलीची कार्यवाही सुरु आहे. अन्य १ वाहतूक निरीक्षक यांची अन्यत्र बदली करण्यात आलेली आहे.

---

## पुणे शहरातील रस्त्यांवर सखल भागात पावसाचे पाणी साचण्याच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याबाबत

**(३४) ६५५८७ (२८-०८-२०२३). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहराच्या व उपनगरांच्या रस्त्यांवर व सखल भागांमध्ये पावसाचे पाणी साचण्याचे प्रमाण वाढत असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच पुणे महापालिकेकडून शहरात पावसाळापुर्वी केल्या जाणाऱ्या नालेसफाईवर कोटयावधी रुपये खर्च करुन देखील पावसाळयात शहरात पाणी साचले जात असल्याबाबत नागरिकांची तक्रारी आहेत हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यंदाच्या अवकाळी पावसातच शहरात पाणी साचल्याने पालिकेच्या नालेसफाईच्या कारभाराबाबत सांशकता व्यक्त होत असून या कामांसदर्भात प्राप्त झालेल्या निविदाही वादग्रस्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने पुणे शहरात व उपनगरात पाणी साचू नये याकरीता कार्यवाही करण्याबाबत तसेच नालेसफाईच्या निविदांसंदर्भात चौकशी करुन सदरील कामांमध्ये पारदर्शकता आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### बीड जिल्हयातील नगर-बीड-परळी व वर्धा-नांदेड रेल्वे प्रकल्प पूर्ण करण्याबाबत

**(३५) ६६१५४ (३०-०८-२०२३). श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्हयातील नगर-बीड-परळी व वर्धा-नांदेड रेल्वेमार्गासाठी ५ हजार ३२६ कोटीच्या तरतुदीची घोषणा केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नगर-बीड-परळी हा मार्ग माहे मार्च, २०१९ पर्यंत पूर्ण करण्यात येईल असे आश्वासन देऊनही अदयाप सदर रेल्वेमार्ग पूर्ण केलेला नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नगर-बीड-परळी व वर्धा-नांदेड रेल्वे प्रकल्प अपूर्ण असल्याप्रकरणी शासनाने चौकशी करुन, सदर दोन्ही रेल्वे प्रकल्प लवकर पूर्णत्वास नेण्यासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-११-२०२३) :** (१), (२) व (३) सदर दोन्ही रेल्वे मार्गाची कामे ही मध्य रेल्वे (केंद्र शासन) मार्फत करण्यात येत आहेत. अहमदनगर-बीड-परळी वैजनाथ या नवीन रेल्वे प्रकल्पाची किंमत रु.४८०५.१७ कोटी असुन सदर किंमतीच्या ५०% म्हणजेच रु.२४०२.५९ कोटी इतका राज्य शासनाचा आर्थिक सहभाग आहे. त्यापैकी दि.३१.०३.२०२३ पर्यंत रु १८०७.९३ कोटी इतका निधी रेल्वेला प्रदान करण्यात आला आहे.

वर्धा-यवतमाळ-नांदेड या नवीन रेल्वे मार्ग प्रकल्पाची किंमत रु.२५०१.०५ कोटी असुन सदर किंमतीच्या ४०% म्हणजेच रु.१०००.४२ कोटी इतका राज्य शासनाचा आर्थिक सहभाग आहे. त्यापैकी दि.३१.०३.२०२३ पर्यंत रु.८३७.९५ कोटी इतका निधी रेल्वेला प्रदान करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### पुणे महानगरपालिकेतील कोंढवा येथे अन्न व अन्नपदार्थाची अत्याधुनिक प्रयोगशाळेचा प्रकल्प बंद अवस्थेत असल्याबाबत

**(३६) ६६७९० (१२-०९-२०२३). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिकेने कोंढवा येथे अन्न व अन्नपदार्थाची प्रयोगशाळा हा पावणे आठ कोटी खर्च करुन अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारली असून सद्य:स्थितीत सदरहू प्रकल्प बंद अवस्थेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रयोगशाळेत सन २०१४ मध्ये ७ कोटी ७० लाख रुपयांची अत्याधुनिक उपकरणे घेण्यात आली असून, सदरहू प्रयोगशाळा फूड हायजेनिक अँड हेल्थ लॅब या संस्थेला ५ वर्षाच्या करारावर देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संस्थेच्या करारामध्ये महापालिकेतील खर्च वजा करुन दरवर्षी ५० लाख रुपये वार्षिक उत्पन्न मिळणार आहे असे नमूद करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर संस्थेमार्फत प्रत्यक्षात पाच वर्षांमध्ये फक्त बारा लाख रुपये उत्पन्न मिळाल्यामुळे महानगरपालिकेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, हेही खरे आहे काय
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन झालेल्या नुकसानीबाबत संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय हे खरे आहे.
फूड हायजीन एन्ड हेल्थ लॅब या संस्थेला मुख्य सभा ठ.क्र.६८८ दि. २०.०२.२०१३ अन्वये दि. ३१.०१.२०१८ पर्यंत या पाच वर्ष कालावधीसाठी करारावर देण्यात आली होती.
(३) हे खरे नाही.
(४) पुणे मनपा हद्दीतील नागरिकांना त्यांच्याकडील अन्नपदार्थ, बचत गटामार्फत शालेय विद्यार्थींना देण्यात येणारे अन्न पदार्थ पाणी पुरवठा विभाग तसेच व्यवसायिक यांना अन्न व अन्नपदार्थाची अल्प दरात तपासणी सेवा उपलब्ध करण्यात आली होती.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हडपसर (जि.पुणे) येथील महापालिकेच्या साने गुरुजी शाळेच्या परिसरात असलेली अस्वच्छता**

**(३७) ६६८०३ (३१-०८-२०२३). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हडपसर (जि.पुणे) येथील महापालिकेची ३२ नंबर साने गुरुजी शाळेच्या दोनही गेटसमोरील आवारात सतत कचरा व घाण साठलेली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच शाळेच्या आतून सुद्धा अस्वच्छता पसरल्याने तेथील विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने माहिती घेऊन शाळेच्या स्वच्छतेबाबत कामचुकारपणा करणाऱ्या संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह शाळे सभोवतालचा परिसर स्वच्छ ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-११-२०२३) :** (१)अंशत: खरे आहे.
पूर्वी स्वच्छतेचे सफाई सेवक तेथे ढकलगाडया लावत होते. परंतु सद्य:परिस्थितीमध्ये तिथे कोणत्याही प्रकारच्या कचऱ्याची साठवणूक होत नाही किंवा पडत नाही.
(२) नाही.
शाळेच्या आतील व बाहेरील परिसराची पुणे महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्याद्वारे वारंवार साफसफाई करण्यात येते.
(३) सदर प्रकरणी शाळेच्या स्वच्छतेबाबत कामचुकारपणा करणारे कर्मचारी निदर्शनास आले नसल्याचे तसेच शाळेच्या आवारातील व बाहेरील परिसर स्वच्छ राहील याची वेळोवेळी महानगरपालिकेमार्फत दक्षता घेण्यात येत असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे जिल्ह्यातील शिवने स्मशानभूमीजवळील नदीपात्रात होत असलेल्या अतिक्रमणाबाबत

**(३८) ६६८०४ (३१-०८-२०२३). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील शिवणे स्मशानभूमी जवळील नदीत मोठ्या प्रमाणात राडारोडा टाकून नदीचे पात्र अरुंद करून जागा बळकाविण्याचे प्रयत्न सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ज्या ठिकाणी राडारोडा टाकण्यात येत आहे त्या ठिकाणी नदीचे पात्र अरुंद असल्यामुळे येणाऱ्या पावसाळ्यात पुराचा मोठा धोका निर्माण होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच या परिस्थितीमध्ये नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून स्थानिक प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती चौकशी करुन संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुद्ध कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-११-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
नदीकाठालगत ब्ल्यू लाईन मध्ये काही प्रमाणात राडारोडा टाकल्याने निदर्शनास आले आहे.
(२), (३) व (४) नदीकाठा लगत टाकलेला राडारोडा काढून घेण्यात आला आहे. तसेच नदीकडे जाणाऱ्या कच्च्या रस्त्यावर वारजे-कर्वेनगर वॉर्ड ऑफिसकडून चर खोदण्यात आली असून वाहनांना प्रतिबंध करण्यात आले आहे. वेळोवेळी सदर ठिकाणी बांधकाम विकास विभाग झोन क्र.३ व क्षेत्रिय कार्यालयाचे आरोग्य विभागाचे गस्त पथकामार्फत पाहणी करण्यात येत आहे. परीणामी नदी काठी राडारोडा टाकणेस प्रतिबंध झाला आहे. सदर ठिकाणी नदीपात्र पूर्वीप्रमाणे झाले असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## परभणी शहरात पाण्याची गळती होत असल्यामुळे कांही वसाहतींना मुबलक पाणी पुरवठा होत नसून अस्वच्छ पाणी पुरवठा होत असल्याबाबत

**(३९) ६६८४८ (३१-०८-२०२३). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यात उन्हाळ्यामध्ये प्रशासनाकडून पाण्याची काटकसर करावी असे आवाहन केले जात असतांना मांत्र दुसरीकडे परभणी शहरातील कांही भागात पाण्याच्या जलवाहिनीमधून गळती झाल्याने किंवा तांत्रिक दुरुस्ती अभावी पाण्याचा अपव्यय होत असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाण्याची गळती होत असल्यामुळे कांही वसाहतींना मुबलक पाणी पुरवठा होत नसून अस्वच्छ पाणी पुरवठा होत असल्याच्या तक्रारी नागरीकांकडून स्थानिक प्रशासनाकडे प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, परभणी शहरातील नागरीकांना पाणी टंचाईचा सामाना करावा लागू नये व स्वच्छ पाणी पुरवठा व्हावा याकरीता सदर गळती तातडीने दुरुस्त करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-११-२०२३) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
राहाटी हेडवर्क या ४५ वर्षांपूर्वीची योजना असून शहरातील ४ जलकुंभावरुन २ ते ३ दिवसातून साखळी पद्धतीने पाणी पुरवठा करण्यात येतो.

सदर योजना जुनी असल्यामुळे व त्यात वेळोवेळी नविन पाईप व कनेक्शन समाविष्ट केल्याने तसेच Rising main ५०० mm C.I पाईपची असल्याने सदरील पाईपद्वारे गळतीचे प्रमाण आढळून येते.

तद्अनुषंगाने, महानगरपालिकेमार्फत तातडीची उपाय योजना करुन गळती दुरुस्तीचे काम वेळीच करुन घेण्यात येते.

(२) हे खरे नाही.

सर्व जलकुंभावरुन पाण्याचे तसेच नळाच्या पाण्याचे नमुने तपासण्यात येतात. महानगरपालिकेकडून शहरातील नागरिकांना बीआयएस नॉर्मस नुसार पाणीपुरवठा केला जातो.

(३) महानगरपालिकेमार्फत पाण्याच्या जलवाहिनीमधून गळती दुरुस्तीसाठी स्वतंत्र यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे.

नागरिकांच्या तक्रारी सोडविण्यासाठी तिन्ही प्रभाग समितीसाठी कनिष्ठ अभियंता यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

नागरिकांमार्फत प्राप्त तक्रारीचे निवारण २४ तासाच्या आत करण्यात येत असल्याचे आयुक्त, परभणी शहर महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी शहरातील भटक्या कुत्र्यांच्या त्रास नागरिकांना होत असल्याबाबत**

**(४०) ६६८५२ (३१-०८-२०२३). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी शहरातील रस्त्यांवर भटक्या कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असून नागरीकांना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महापालिका यंत्रणेकडून कुत्र्यांच्या नसबंदीसाठी लाखो रुपये खर्च करुनही भटक्या कुत्र्यांची संख्या कमी न होता दिवसेंदिवस वाढत असून सद्यःस्थितीत शहरात १५ हजार पेक्षाही जास्त भटके कुत्रे असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नसबंदीसाठी महापालिका प्रशासनाने सन २०२२ मध्ये नियुक्त केलेल्या पीपल फॉर ॲनिमल नावाच्या कंपनीची नियुक्ती केली असून सदर यंत्रणेचे याकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याप्रकरणी चौकशी करुन संबंधित कंपनीवर कोणती कारवाई केली तसेच भटक्या कुत्र्यांचा नागरीकांना होणारा त्रास दूर होण्याकरीता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-११-२०२३) :** (१), (२) व (३) परभणी शहरातील भटक्या कुत्र्यांपासून नागरीकांना होणारा त्रास कमी करण्यासाठी व भटक्या कुत्र्यांची संख्या नियंत्रित करण्यासाठी महानगरपालिकेने मोकाट श्वान पकडणे, निर्बिजीकरण, लसीकरण करणे तसेच श्वान मुक्त करेपर्यंत त्याचा खानपानाचा खर्च करणेकरीता निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे व याद्वारे निर्बिजीकरणासाठी पिपल्स फॉर ॲनिमल, जि.भंडारा या संस्थेस मे-२०२२ मध्ये कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत.

या संस्थेमार्फत मे २०२२ ते जून २०२३ या कालावधीत ४४८० भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण करण्यात आले.

(४) भटक्या कुत्र्यांपासून नागरीकांना होणारा त्रास कमी करण्यासाठी व भटक्या कुत्र्यांची संख्या नियंत्रित करण्यासाठीचे काम विहित मुदतीत पूर्ण करण्यासाठी महानगरपालिका प्रशासनामार्फत संबंधित कंपनीस नोटीस बजावण्यात आली असून सदरचे काम लवकरात लवकर पूर्ण व्हावे म्हणून पूर्ण वेळ कर्मचाऱ्याची नियुक्ती महानगरपालिकेकडून करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अहमदपूर शहरातील (जि.लातूर) लिंबोटी प्रकल्पातून नागरिकांना मुबलक पाणीपुरवठा करण्याबाबत

**(४१) ६६९२६ (२७-०८-२०२३). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदपूर (जि.लातूर) शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या लिंबोटी प्रकल्पात मुबलक प्रमाणात पाणी साठा असतांनाही नियोजनाअभावी तेथील नागरीकांना महिनांतून फक्त दोन दिवस पाणीपुरवठा करण्यात येत असल्याची बाब दिनांक १२ मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाणीपुरवठा करणाऱ्या लिंबोटी प्रकल्प योजनेवर ४४ कोटी रुपये खर्च करुन सुध्दा तेथील नागरीकांना दोन दिवस पाणीपुरवठा करण्यात येत असल्यामुळे त्यांच्यात तीव्र असंतोष निर्माण झाला आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) अंशतः खरे आहे.

लिंबोटी पंपगृह येथील विद्युत पुरवठा कमी दाबाने होत असल्यामुळे नगरपरिषदेचे दोन्ही पंप एकाच वेळी सुरु होऊ शकले नाहीत. यामुळे दि.२२.०२.२०२३ ते दि.२८.०२.२०२३ या कालावधीत पाणीपुरवठा बंद होता. तसेच मौजे शिंदगी येथील मुख्य जलवाहिनी आणि मौजे गौंडगाव शिवारामधील जलवाहिनीच्या गळतीमुळे पाणीपुरवठा खंडीत झाला होता. तथापि, विद्युत देयकांचा भरणा करुन व लिंबोटी प्रकल्पाच्या विद्युत पुरवठ्याचे विद्युत दाब वाढवून घेऊन, तसेच मौजे शिंदगी आणि मौजे गौंडगाव येथील जलवाहिन्यांची गळती दुरुस्त करुन पाणीपुरवठा सुरु करण्यात आला आहे.

(३) व (४) लिंबोटी पंपगृह येथील पंपगृह येथील वारंवार खंडीत होणाऱ्या विद्युत पुरवठ्याबाबत जिल्हाधिकारी, लातूर यांनी वेळोवेळी दिलेल्या सूचनांनुसार महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, लातूर व अहदपूर यांनी माहे मे, २०२३ पासून विद्युत पुरवठा सुरळीत केला आहे. त्यामुळे सद्यस्थितीत नगरपरिषदेमार्फत पाणी उपलब्धतेनुसार शहरास ५ दिवसआड एक वेळ पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भुसावळ नगर परिषदेचे तत्कालीन मुख्याधिकारी यांच्याविरुद्ध प्रलंबित असलेल्या तक्रारीबाबत

**(४२) ६६९५२ (३१-०८-२०२३). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ नगरपरिषदेचे तत्कालीन मुख्याधिकारी श्री.संदीप चित्तरवार यांच्या बाबतीत विविध प्रकारे गैरव्यवहार केला असल्याची तक्रार राज्य शासनाकडे सन २०२२ ते आजपर्यंत केले असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने मुख्याधिकारी, यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.

तथापि, जिल्हाधिकारी, जळगाव यांच्याकडे भुसावळ नगरपरिषद अंतर्गत सुरु असलेल्या विविध विकास कामांची चौकशी करण्यासंदर्भात तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

(२) जिल्हाधिकारी, जळगाव यांच्याकडे प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने, जिल्हाधिकारी, जळगाव यांच्या दि.२३.०३.२०२२ रोजीच्या आदेशान्वये त्रिसदस्यीय चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीमार्फत विकास कामांचे नगरपरिषद स्तरावर उपलब्ध असलेल्या अभिलेखांची तपासणी, तसेच निवडक कामांची प्रत्यक्ष स्थळपाहणी केली असता, सदर कामे योग्य असल्याचे प्रथमदर्शनी आढळून आल्याबाबतचा चौकशी अहवाल समितीने जिल्हाधिकारी, जळगाव यांना सादर केला आहे. सदरचा अहवाल जिल्हाधिकारी, जळगाव यांनी मान्य केला असून, अन्य तक्रारींच्या अनुषंगाने समिती स्थापन करण्याबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी स्तरावर सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील कचरा मांडवा, सासवली व वरसोली (ता.अलिबाग ,जि.रायगड) येथे वाहत येत असल्यामुळे येथील सागरी जैवविविधतेला धोका निर्माण झाल्याबाबत**

**(४३) ६७२७६ (३१-०८-२०२३). श्री.नारायण कुचे (बदनापूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतून हजारो टन कचरा दररोज समुद्रात फेकला जात असून हा कचरा मांडवा, सासवणे, वरसोली (ता.अलिबाग, जि.रायगड) या समुद्रकिनाऱ्यावर वाहत येतो आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे येथील सागरी जैवविविधतेला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन कचऱ्यांची विल्हेवाट लावण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे, तसेच हा कचरा समुद्रात फेकणाऱ्यांची चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-११-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तां) रायगड-अलिबाग यांनी दिनांक ०७ जुलै, २०२३ रोजीच्या पत्राद्वारे सागरी जिवाच्या अन्नसाखळीत बाधा येणे व मत्स्य दुष्काळाचे संकट निर्माण होणे इत्यादी बाबत कोणतेही निवेदन प्राप्त न झाल्याचे कळविलेले आहे. तसेच हा मुद्दा अति उच्चस्तरावरील शास्त्रीय स्वरुपाचा, गुंतागुतीचा असल्याने भाष्य करता येणार नसल्याचे नमूद केलेले आहे.
(३) अलिबाग नगरपरिषद यांनी दिनांक ०५ जुलै, २०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे की, समुद्रकिनारी वाहत आलेला कचरा हा समुद्रकिनारा स्व्च्छता मशिनद्वारे संकलित करण्यात येतो. तसेच पर्यटकांकरिता ठिकठिकाणी कचऱ्याचे डस्टबिन ठेवण्यात आलेले आहेत व समुद्रकिनारी स्व्च्छता करण्याकरिता सफाई कामगारांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचेद्वारे दररोज कचरा संकलित केला जातो व सदर कचऱ्याची विल्हेवाट ही नगरपरिषदच्या MRF प्रकल्पावर लावण्यात येते.
उपमुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांनी दिनांक ०७ जुलै, २०२३ रोजी कळविल्याप्रमाणे ग्रामपंचायतीच्या आर्थिक परिस्थितीनुसार उचलण्याचा प्रयत्न केला जातो.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चांदुरबाजार-अमरावती मार्गे (ता.तिवसा,जि.अमरावती) देवरा (शहिद), ब्राम्हणवाडा भगत, देवरी, कठोरा बु.नांदगांव पेठ येथील बससेवा पूर्ववत सुरु करण्याबाबत**

**(४४) ६७९५५ (३०-०८-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर**

**(पाथरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदुरबाजार अमरावती मार्गे (ता.तिवसा,जि.अमरावती) देवरा (शहिद), ब्राम्हणवाडा भगत, देवरी, कठोरा बु.नांदगांव पेठ येथील बससेवा ही पुलाचे बांधकामामुळे बंद करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पूलाचे काम पूर्ण झाल्यामुळे उक्त मार्गांवरील बसची फेरी पूर्ववत सुरु करण्यात यावी याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, अमरावती यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उपरोक्त मार्गावरील बस पूर्ववत सुरु करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-११-२०२३) :** (१) व (२) होय.

(३) व (४) चांदुरबाजार ते अमरावती मार्गे ब्राम्हणवाडा भगत,देवरा,देवरी, या मार्गावरील पुलाचे काम पूर्ण झाल्याचा दाखला प्राप्त झाल्यानंतर त्या मार्गावरील बंद असलेली वाहतुक दि.०१.०७.२०२३ पासून पुर्ववत सुरु करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

---

## नांदेड महानगरपालिकेची मे.चिंतामणी केमीकॉर्प कंपनीने बनावट अनुभव प्रमाणपत्र सादर करुन शासनाची केलेली फसवणुक

**(४५) ६८२१६ (२७-०८-२०२३). श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड महानगरपालिकेतील जलशुध्दीकरण केंद्रात दुषित पाणी शुध्द करण्याबाबत तुरटीची निविदा मिळविण्यासाठी मे.चिंतामणी केमीकॉर्प परळी वैजनाथ या संस्थेने बनावट अनुभव प्रमाणपत्र सादर करुन निविदा मिळविण्याचा प्रकार माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मे.राज कन्स्ट्रक्शन व इनोव्हेटिव्ह इंजिनिअरिंगला महानगरपालिका प्रशासनाच्या नियम व अटींचा भंग केल्यामुळे त्यांना काळया यादीत टाकण्यात आले असून, मे.चिंतामणी केमीकॉर्प कंपनी यांनी फसवणूक करुनही त्यांना काळया यादीत टाकण्यात आले नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन संबंधित कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-११-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

मे.चिंतामणी केमीकॉर्प यांची आस्थापना नोंदणी रद्द करण्यासाठी कार्यालयीन पत्र क्र.नांवाशमनपा/पापुवजनि/४३६४/२३,दिनांक ७.७.२०२३ अन्वये निरीक्षक, दुकान व संस्था नोंदणी कार्यालय, आंबेजोगाई, जि.बीड यांना शिफारस करण्यात आलेली असून नांदेड महानगरपालिकेअंतर्गत सर्व प्रकारच्या निविदा सहभागास कायमस्वरुपी प्रतिबंधीत करण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(३) मे.चिंतामणी केमीकॉर्प, परळी यांचे प्रोप्रायटर यांच्याविरुद्ध भारतीय दंड संहिता १८६० मधील कलम ४२०, ४६५, ४६८ व ४७१ मधील तरतूदीनुसार वजिराबाद पोलीस स्टेशन, नांदेड येथे एमआयआर नं.२२, दिनांक २५.१.२०२३ अन्वये गुन्हा नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेकडून दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सेलू (जि.परभणी) तालुक्याकरीता नागरिकांना सुरळीत बस सेवा पुरविण्याबाबत**

**(४६) ६८३२५ (३१-०८-२०२३). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेलू तालुक्याच्या (जि. परभणी) निर्मितीला तब्बल ३१ वर्षांचा कालावधी लोटला तरीही येथील नागरिकांना इतर तालुक्यावर अवलंबून राहावे लागत असल्याने येथील नागरिकांची उपेक्षा कायमच आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याचबरोबर येथील बस स्थानक सुसज्ज आहे मात्र बससेवेच्या नियोजनासाठी पाथरी बस डेपोवर सेलू तालुक्याला अवलंबून राहावे लागत असून नागरिकांना अनेक गैरसोयींना सामोरे जावे लागत असल्याचे दिनांक १९ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार सेलू येथील नागरिकांकरिता सुरळीत बस सेवा पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-११-२०२३) :** (१) नाही.

(२) व (३) सेलू प्रवाशांच्या मागणीनुसार व सोयीनुसार बससेवा सुविधा पुरविण्यात येत असून एकूण २५८ फेऱ्या चालनात आहेत. सेलू येथे पाथरी आगाराच्या अंर्तगत वाहतूक नियंत्रण कक्ष कार्यान्वित आहे. सेलू नियंत्रण कक्ष पाथरी आगारापासून २४ कि.मी. दूर आहे. पाथरी आगारामार्फत पाथरी ते सेलू या मार्गावर ३६ फेऱ्या चालनात असून वारंवारीता १ तास आहे. तसेच पाथरी आगारामार्फत सेलू तालुक्यातील ग्रामीण भागात फेऱ्या चालनात आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागरी जमीन कमाल धारणा कायदयातंर्गत (युएलसी) राज्य शासनाकडे ताब्यात असलेली सदनिका शासकीय निवासस्थान म्हणून वापर करण्याबाबत**

**(४७) ६८४७५ (३१-०८-२०२३). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागरी जमीन कमाल धारणा कायदयातंर्गत (युएलसी) राज्य शासनाकडे १२५६ सदनिका ताब्यात असलेली घरे शासकीय निवासस्थान म्हणून वापर करण्याचा निर्णय राज्य शासनाने माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू घरे पोलिसांना किंवा म्हाडाला देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासन स्तरावर अंमलबजावणी करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-११-२०२३) :** (१) व (२) अंशतः खरे आहे.

शासनाच्या ५% स्वेच्छाधिकार कोट्यातील सदनिका वाटपाबाबतच्या दि.३०.११.२०११ रोजीच्या धोरणासंदर्भात रिट याचिका क्र.८८२/२०११ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दि.२०.०३.२०१४ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने, शासनाच्या ५% स्वेच्छाधिकार कोट्यातील सदनिका शासन पत्र दि.३०.११.२०१५ व दि.२५.१०.२०१६ अन्वये शासकीय निवासस्थाने म्हणून वाटप करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. तदनंतर शासन निर्णय दि.२३.०६.२०२१ नुसार सामान्य प्रशासन विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग व पोलिस गृहनिर्माण मंडळ यांनी शासनाच्या ५% स्वेच्छाधिकार कोट्यातून प्राप्त झालेल्या सदनिकांची मागणी न केल्यास किंवा मागणीशिवाय शिल्लक असलेल्या व सक्षम प्राधिकारी कार्यालयाने ताब्यात घेतलेल्या सदनिका जाहीरातीव्दारे वाटप करण्यासाठी म्हाडाकडे हस्तांतरीत करण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे.

(३) शासन निर्णय दि.२३.०६.२०२१ नुसार घेण्यात आलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार शासनाच्या ५% स्वेच्छाधिकार कोट्यातून प्राप्त झालेल्या सदनिका म्हाडामार्फत जाहीरातीव्दारे विक्री करण्यासाठी, सदनिका वाटपाचे निकष व किंमती महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळासोबत विचारविनिमय करुन ठरविण्याच्या अनुषंगाने शासन स्तरावर निर्णय घेण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नांदेड जिल्ह्याच्या महानगरपालिकेतील १८० गुंठेवारी संचिका गायब झाल्याबाबत

**(४८) ६८८७० (२७-०८-२०२३). श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्याच्या महानगरपालिकेतील १८० गुंठेवारी संचिका गायब झाल्याचा प्रकार माहे जुन, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील गुंठेवारीच्या बोगस प्रकरणात मोठे रॅकेट असून कार्यालयातील काही कर्मचारी ही सामिल असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गुंठेवारी प्रमाणपत्र संचिकेमधील पावत्यांची शहानिशा करण्यासाठी दिनांक २३ जानेवारी, २०२३ रोजी महानगरपालिकेमध्ये समिती गठीत करण्यात आली असून, सदर समितीमार्फत संचिकेमधील पावत्यांची शहानिशा करण्याचे काम पुर्ण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने चौकशी करुन या प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत गुंठेवारी विभागातील १७५ संचिका आढळत नसल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

गुंठेवारी बोगस प्रकरणात गुंठेवारी विभागातील प्रभारी लिपिक हे सामील असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे त्यांच्यावर वजीराबाद पोलीस ठाणे, नांदेड येथे दिनांक १५.१२.२०२२ रोजी गुन्हा नं.४४३/२०२२ दाखल करण्यात आला आहे.

तसेच संबंधितांना निलंबित करुन विभागीय चौकशी प्रस्तावित केली आहे. त्याचप्रमाणे सदर गुन्ह्याच्या तपासा दरम्यान गुंठेवारी विभागातील सेवकाचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्यामुळे त्यांना दिनांक २.५.२०२३ रोजी अटक करण्यात आली आहे.

(३) होय, हे खरे आहे.

दिनांक २३.१.२०२३ रोजी गुंठेवारी प्रमाणपत्र संचिकेमधील पावत्यांची शहानिशा करण्यासाठी महानगरपालिकेमध्ये समिती गठीत करण्यात आली असून सदर समितीमार्फत संचिकेमधील पावत्यांची शहानिशा करण्याचे काम पूर्ण झाले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## एसटी महामंडळाच्या पुणे विभागाची प्रलंबित भरती सुरू करण्याबाबत

**(४९) ६९७१२ (३१-०८-२०२३). श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एसटी महामंडळ, पुणे विभागाची प्रलंबित भरती सुरु करण्यासाठी पुणे विभागातील पात्र उमेदवार दुसऱ्यांदा आझाद मैदानावर उपोषणासाठी बसण्याच्या तयारीत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २० फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास उमेदवार उपोषणाला बसले असता, त्यांना दोन महिन्यांमध्ये सर्व सुरळीत होईल असे आश्वासन देण्यात देण्यात आले असूनही अद्याप एसटी प्रशासनाकडून कोणतीही कार्यवाही झाली नसल्याने हे उमेदवार पुन्हा दिनांक १५ मे पासून आंदोलनाच्या तयारीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एसटी महामंडळाने सन २०१९ मध्ये दुष्काळग्रस्त भागातील मुलांसाठी सरळसेवा भरती काढली होती त्यामध्ये १२ विभागांची ४ हजार ४१६ जागांची चालक तथा वाहक पदांची जाहिरात निघाली होती, त्यामध्ये पुणे विभागाने आधी लेखी परीक्षा, कागदपत्र छाननी, वैद्यकीय चाचणी करुन त्यामधून २९८२ मुलांना दिनांक १७ जानेवारी, २०२० पासून भोसरी येथे वाहन चाचणीसाठी बोलावले होते त्यातील २३०० मुलांची चाचणी झाल्यावर दिनांक २५ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास भोसरी येथील ट्रॅक बंद पडला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, तेव्हापासून हा ट्रॅक बंदच असल्याने भरती मधील मुलांना सतत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मुख्य सचिव यासह एस टी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे दाद मागावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या पात्र मुलांचे वय निघून जात असल्यामुळे मुलांची लग्न होत नसल्याने पुणे विभागातील उमेदवार दुसऱ्यांदा आझाद मैदानावर उपोषणास बसणार आहेत हे खरे आहे काय,
(६) असल्यास, पुणे विभागातील राहिलेल्या मुलांची चाचणी तात्काळ घेऊन १६४७ जागांची अंतिम निवड यादी जाहीर करावी अशी मागणी या पात्र उमेदवारांनी केली आहे, हे खरे आहे काय,
(७) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, त्या अनुषंगाने प्रलंबित भरती सुरु करण्यासह अंतिम निवड यादी जाहीर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-११-२०२३) :** (१), (२), (३), (४), (५), (६) व (७) रा.प. पुणे विभागातील सरळसेवा भरती सन २०१९ अंतर्गत निवड झालेल्या उमेदवारांपैकी प्रलंबित ९४८ उमेदवारांची संगणकीकृत वाहन चालन चाचणी दि.०५.०७.२०२३ रोजी पासून घेणे बाबतची कार्यवाही सुरु करण्यात आली.

दि.०५.०७.२०२३ ते १०.०८.२०२३ अखेर पर्यत उर्वरित उमेदवारांची वाहन चालन चाचणी बाबतची कार्यवाही पूर्ण करण्यात आलेली आहे. सदर चाचणीमध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची निवडयादी व अतिरिक्त निवड यादी पुणे विभागाकडून तयार करण्यात येवून प्रसारीत करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत निवड यादीवरील ११२४ उमेदवारांना वैद्यकीय तपासणीसाठी पाठविण्याची कार्यवाही सुरु असून वैद्यकीय तपासणीमध्ये पात्र होणाऱ्या उमेदवारांना चालक तथा वाहक पदाचे ४८/८० दिवसांचे सेवापूर्व प्रशिक्षण देण्यात येईल. सेवापूर्व प्रशिक्षणानंतर अंतिम वाहन चालन चाचणीमध्ये उत्तीण होणाऱ्या उमेदवारांना आरक्षण व जागेच्या रिक्तते नुसार रा.प. पुणे विभागात सामावून घेण्याबाबतची कार्यवाही विभागीय स्तरावर करण्यात येत आहे.

---

## पुणे जिल्ह्यातील मुळा मुठा व भीमा नदीत येणाऱ्या जलपर्णी काढण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरण्याबाबत

**(५०) ७०१६९ (३१-०८-२०२३). ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील मुळा मुठा व भीमा नदीत प्रदूषित पाण्यामुळे मोठ्या प्रमाणावर जलपर्णी येत असून यामुळे दुर्गंधी निर्माण होऊन नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी लोकप्रतिनिधी यांनी मा.मंत्री यांचे समवेत दिनांक १७ एप्रिल २०२३ रोजी बैठक घेऊन उपाययोजना करण्याबाबत मागणी केली असून, तत्संदर्भात श्री. शेखर भाडसावली यांचे तंत्रज्ञान वापरण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे हे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-११-२०२३) :** (१) पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मुळा, मुठा नदीच्या संदर्भात अंशतः खरे आहे.

(२) सन २०२३ च्या पावसाळी अधिवेशनात विधानसभेत उपस्थित लक्षवेधीवरील चर्चेदरम्यान मा. मंत्री महोदयांनी दिलेल्या आश्वासनानुसार दि. १०.१०.२०२३ रोजी प्रधान सचिव (नवी-२) यांच्या अध्यक्षतेखाली संबंधित सर्व लोकप्रतिनिधी तसेच श्री. चंद्रशेखर भडसावळे यांच्या समवेत बैठक घेण्यात आली आहे.

(३) श्री. चंद्रशेखर भडसावळे यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे महानगरपालिका व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांनी संयुक्तरित्या प्रायोगिक तत्वावर पुणे महानगरपालिका क्षेत्रातील तलावातील जलपर्णीवर ग्लायफोसेट चा वापर करण्याबाबत निर्णय घेतला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.